महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

Rs.2/-

शनिवार ■ ०९ ऑगस्ट २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक ०४९ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024


# बदलापुरच्या प्रभाग रचनेत घोटाळा ?

## आमदार किसन कथोरेंकडून फेररचनेची मागणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** बदलापूरः येत्या काळात होऊ घातलेल्या कुळगाव-बदलापूर नगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर नगरपालिकेच्या प्रभाग रचनेत मोठा घोटाळा झाल्याचा गंभीर आरोप मुरबाड विधानसभा मतदारसंघाचे आमदार किसन कथोरे यांनी केला आहे. या संदर्भातील तक्रार पत्र त्यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राज्य निवडणूक आयोगाचे मुख्य आयुक्त यांना दिली असून, सध्याची प्रभाग रचना तात्काळ रद्द करून आपल्या देखरेखीखाली नवी रचना करण्यात यावी अशी मागणी आमदार कथोरे यांनी केली आहे.

आमदार कथोरे यांनी पत्रात नमूद केले आहे की, नगरपालिकेचे मुख्याधिकारी मारुती गायकवाड, जे सध्या प्रशासक पदावरही कार्यरत आहेत, यांनी काही इच्छुक उमेदवार, ठरावीक पक्षाचे पदाधिकारी आणि माजी नगरसेवक यांच्या फायद्यासाठी प्रभाग रचना केली आहे. यासाठी आर्थिक देवाणघेवाण झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. कथोरे यांच्या मते, नदी, नाले, राज्य महामार्ग, रेल्वे आदी बाबत स्पष्ट नियमावली अस्तित्वात असतानाही ती धाब्यावर बसवून लाखो रुपयांच्या बदल्यात प्रभाग रचना करण्यात आली.

आमदार कथोरे यांनी पत्रात नमूद केले आहे की, नगरपालिकेचे मुख्याधिकारी मारुती गायकवाड, जे सध्या प्रशासक पदावरही कार्यरत आहेत, यांनी काही इच्छुक उमेदवार, ठरावीक पक्षाचे पदाधिकारी आणि माजी नगरसेवक यांच्या फायद्यासाठी प्रभाग रचना केली आहे. यासाठी आर्थिक देवाणघेवाण झाल्याचा आरोप



करण्यात आला आहे. कथोरे यांच्या मते, नदी, नाले, राज्य महामार्ग, रेल्वे आदी बाबत स्पष्ट नियमावली अस्तित्वात असतानाही ती धाब्यावर बसवून लाखो रुपयांच्या बदल्यात प्रभाग रचना करण्यात आली.

या कथित गैरव्यवहारात १५-१६ प्रभागांमध्ये नियम तोडले गेल्याचे कथोरे यांनी पत्रात सांगितले. तसेच, अनुसूचित जाती-जमातींसाठी राखीव असणाऱ्या प्रभागांचे आराखडे ठरावीक उमेदवारांच्या फायद्यासाठी तयार करण्यात आले. या प्रक्रियेत अभियंता एका अभियंत्याच्या माध्यमातून लाखो रुपयांची वसुली झाल्याचाही आरोप त्यांनी केला आहे. आमदार कथोरे यांनी या सर्व प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच, विद्यमान प्रभाग रचना रद्द करून कायदेशीर नियम आणि निकष पाळत, आपल्या नियंत्रणाखाली नव्याने प्रभागरचना करण्याची आवश्यकता असल्याचे पत्रात म्हणाले.

### बदलापुरातील पक्षीय बलाबल

२०२५ मधील निवडणुका लवकरच जाहीर होण्याची शक्यता आहे. एकूण ४७ जागा असलेल्या कुळगाव-बदलापूर नगरपालिकेत, २०१५ च्या निवडणुकीत शिवसेनेने २५ जागा, भाजपने २० जागा, तर राष्ट्रवादी काँग्रेसने २ जागा जिंकल्या होत्या. सध्याची वॉर्डरचना रद्द करण्याची मागणी मान्य झाल्यास निवडणूक प्रक्रियेत विलंब होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. या घडामोडींमुळे येत्या निवडणुकीपूर्वी नगरपालिकेच्या राजकारणात चांगलीच खळबळ उडाली आहे.

बदलापूर शहरात गेल्या काही महिन्यात शिवसेना आणि भाजपातील संघर्ष वाढला आहे. विधानसभा निवडणुकीत संघर्ष टोकाला गेला होता. तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे किसन कथोरे यांच्यासाठी सभा घेताना दिसले. त्यावेळी त्यांनी संघर्ष संपवण्याचे आवाहन केले होते. निकालानंतरच्या पहिल्याच विजयी सभेत कथोरे यांनी विरोधकांना इशारा दिला होता. त्यानंतर एकमेकांवर कुरघोड्या करण्याचे प्रकार सुरूच राहिले. पालिका निवडणुकीत हा महायुतीतील घटकपक्षांचा संघर्ष वाढण्याची शक्यता आहे प्रभार रचनेच्या निमित्ताने हे अधोरिखत होते आहे




## आज चिखलोली अंबरनाथ न्यायालयाचे उद्घाटन

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथ ठाणे,दि.08 :-** चिखलोली-अंबरनाथ येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालयाच्या तसेच नूतन न्यायालयीन इमारतीचे उद्घाटन शनिवार, दि.9 ऑगस्ट 2025 रोजी सकाळी 10.30 वाजता मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती गिरीष कुलकर्णी यांच्या हस्ते संपन्न होणार आहे. या कार्यक्रमाचे मुख्य अतिथी म्हणून महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांची उपस्थिती असणार आहे. तर अध्यक्षपदी ठाणे जिल्ह्याचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीनिवास अग्रवाल हे असून उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्रीराम मोडक, न्यायमूर्ती श्रीमती मंजुषा देशपांडे आणि न्यायमूर्ती अद्वैत सेठना हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहतील.

चिखलोली आणि आसपासच्या परिसरातील नागरिकांना न्याय मिळवण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून या न्यायालयाकडे पाहिले जात आहे. या नवीन न्यायालयामुळे परिसरातील नागरिकांना जलद न्याय मिळण्याचा विश्वास व्यक्त केला जात आहे.

या उद्घाटन सोहळ्यास वकील, वकिलीचे विद्यार्थी, प्रसारमाध्यम प्रतिनिधी व नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, चिखलोली-अंबरनाथ आणि उल्हासनगर तालुका बार ॲडव्होकेट्स फाऊंडेशनचे अध्यक्ष ॲड. संजय सोनवणे यांनी केले आहे.

## वाडा-भिवंडी महामार्गाचे कॉँक्रीटीकरण पुन्हा सुरू

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वाडा :** पूर्ण वाताहत झालेल्या आणि ठिकठिकाणी पडलेल्या प्रचंड खड्ड्यांमुळे वाडावासीयांचे कंबरडे मोडणाऱ्या भिवंडी-वाडा महामार्गाचे ठेकेदाराने थांबवलेले काम शिवसेनेच्या दणक्यामुळे पुन्हा सुरू झाले आहे. या रस्त्याचे काम तातडीने सुरू करा अन्यथा रास्ता रोको करू, असा इशारा शिवसेनेने देताच तहसीलदारांनी तातडीची बैठक बोलावून सामोपचाराने तोडगा काढला. तसेच या महामार्गाच्या दुरुस्तीचे काम तत्काळ सुरू करावे, असे आदेश दिल्याने शिवसेनेने पुकारलेले रास्ता रोको आंदोलन स्थगित करण्यात आले आहे.

भिवंडी-वाडा महामार्गाच्या अक्षरशः चिंधड्या झाल्या आहेत. त्यामुळे अपघात वाढले असून प्रवाशांच्या जीवाशी खेळ होत आहे. त्यातच या रस्त्याच्या कॉँक्रीटीकरणाचे काम करणाऱ्या ठेकेदार कंपनीने बिले न मिळाल्याने गेल्या आठवड्यापासून काम बंद केले होते. त्यामुळे प्रवाशांचे प्रचंड हाल होत होते. याची गंभीर दखल घेऊन शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने गुरुवारी ७ ऑगस्ट रोजी वाडा-भिवंडी महामार्गावर कुडूस नाका येथे रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा दिला. या आंदोल नाला कॉँग्रेस आणि मनसेनेही पाठिंबा दिला. या बैठकीत शिवसेना सहसंपर्कप्रमुख नीलेश गंधे, उपजिल्हाप्रमुख गोविंद पाटील, कॉँग्रेसचे पालघर जिल्हाध्यक्ष प्रफुल्ल पाटील, शिवसेनेचे कांतीलाल देशमुख, प्रकाश केणे, तालुकाप्रमुख नीलेश पाटील, कॉँग्रेसचे तालुकाध्यक्ष दिलीप पाटील, मनसेच्या तालुका अध्यक्षा कांती ठाकरे, शिवसेना शहरप्रमुख प्रमोद घोलप, तालुका सचिव सागर भोईर, कॉँग्रेसचे शहराध्यक्ष राजू पातकर, महिला आघाडीच्या नैना चौधरी, वर्षा गोळे, बेबी पाटील त्याचबरोबर सार्वजनिक बांधकाम विभागाचे पोपट चव्हाण, अजय जाधव, संजय डोंगरे यांच्यासह अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते.



## ठाणे महापालिका आयोजित नारळी पौर्णिमा कोळी बांधवांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात साजरी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे (०८) :** ठाणे महानगरपालिका आयोजित नारळी पौर्णिमेचा सण आज ठाण्यातील कोळी बांधवासमवेत उत्साहात साजरा करण्यात आला. पारंपरिक वेशभूषेत कोळी बांधव या उत्सवात सहभागी झाले होते. यावेळी, माजी उपमहापौर पल्लवी कदम, माजी नगरसेवक पवन कदम, अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी, सहायक आयुक्त सोपान भाईक आणि ललिता जाधव, माहिती व जनसंपर्क अधिकारी रवींद्र मांजरेकर तसेच महापालिका कर्मचारी उपस्थित होते.

## भिवंडी मेट्रो दुर्घटनाप्रकरणी सिस्ट्रावर ठपका

### पाच लाखांचा दंड, चौकशीही सुरू

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

'ठाणे- भिवंडी- कल्याण मेट्रो ५' मार्गिकच्या कामादरम्यान भिवंडी येथे रिक्षातील प्रवाशाच्या डोक्यात लोखंडी सळई शिरली आणि तो गंभीर जखमी झाला. अजूनही त्यांची प्रकृती नाजूक आहे. सोनू अली रमजान अली शेख असे या प्रवाशाचे नाव असून तो २२ वर्षांचा आहे. या प्रवाशाला तातडीने एका खासगी रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले. सध्या त्याच्यावर उपचार सुरू असून त्याची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते. या प्रकरणाची गंभीर दखल घेत एमएमआरडीएने कंत्राटादारासह या मार्गिकच्या सल्लागारावरही ठपका ठेवला आहे. कंत्राटदाराला ५० लाख रुपये, तर सिस्ट्रा कंपनीला पाच लाख रुपये दंड ठोठवण्यात आला आहे. त्याचवेळी या दुर्घटनेच्या चौकशीची जबाबदारी 'अंधेरी पश्चिम मंडाले मेट्रो २ ब' मार्गिकच्या सल्लागार समितीवर सोपविण्यात आली असून एका स्वतंत्र समितीच्या माध्यमातून चौकशी केली जाता आहे. या दुर्घटनेची दखल घेत एमएमआरडीएने कंत्राटदार मे. अफकॉन्स कंपनीला ५० लाख रुपये दंड ठोठावला. त्याचवेळी मेट्रो प्रकल्पाच्या कामात सर्वात मोठी आणि महत्त्वाची जबाबदारी सल्लागार कंपनीची असते. काम करताना सुरक्षेच्या दृष्टीने कोणत्या उपाययोजना करायला हव्यात, काम करताना कोणतीही दुर्घटना होणार नाही याची काळजी कशी घ्यावी या सर्व गोष्टींची जबाबदारी सल्लागार म्हणून सिस्ट्रावर आहे. यात सिस्ट्रा कमी पडल्याचा ठपका ठेवण्यात आला असून सिस्ट्रावरही दंडात्मक कारवाई करण्यात आल्याची माहिती एमएमआरडीतील सूत्रांनी दिली. सिस्ट्रा कंपनीला पाच लाख रुपये दंड ठोठावण्यात आला आहे. तर कंत्राटदारासह याप्रकरणी सिस्ट्राचीही चौकशी करण्यात येणार आहे.

## उल्हासनगर शहर स्थापना दिन उत्साहात साजरा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर शहर स्थापना दिनाचा 76 वा वर्धापन दिन समारंभ शुक्रवार, दिनांक 8 ऑगस्ट 2025 रोजी सकाळी 11:00 वाजता विराट आंबे स्पोर्ट क्लब, तरणतलाव, महापालिका मुख्यालयामागे, उल्हासनगर-3 येथे उल्हासनगर महापालिकेच्या मा. प्रशासक तथा आयुक्त श्रीमती मनीषा आव्हाळे (भा.प्र.से.) यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला.

महापालिकेच्या प्रांगणात सकाळी 9:30 वाजता राष्ट्रगीत व राज्यगीताने सदर कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली व येथील महापुरुषांच्या पुतळ्यांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून येथील संविधान उद्देशिकेच्या कोनशिलेला मा. आमदार श्री. कुमार आयलानी व इतर मान्यवरांनी पुष्पहार अर्पण केला. येथे उभारण्यात आलेल्या सेल्फी पॉईंटवर फोटो काढून "हर घर तिरंगा" अभियानाची जनजागृती



करण्यात आली. त्यानंतर "तिरंगा प्रतिज्ञा" घेण्यात आली. सदर ठिकाणी "तिरंगा कॅनव्हासची" व्यवस्था करण्यात आली होती. सन्माननीय उपस्थितांनी, महापालिका अधिकारी/कर्मचारी व शाळा/कॉलेजच्या विद्यार्थी यांनी "घरोघरी तिरंगा", "हर घर तिरंगा", "जय हिंद" लिहून व स्वाक्षरी करून देशाप्रती आपला आदर व्यक्त केला.

महापालिकेच्या प्रांगणात उपस्थित असलेले सन्माननीय आमदार श्री. कुमार आयलानी, महापालिकेतील अधिकारी/कर्मचारी, अग्निशमन दलातील जवान, सुरक्षा रक्षक, वैद्यकीय पथक, उल्हासनगर महापालिका शाळा,आर.के.टी. कॉलेज, एसएसटी कॉलेज, CHM कॉलेज ,एस.एम.कॉलेज, सेंट पॉल कॉलेज यांच्या सर्व विद्यार्थी यांचेसह "तिरंगा रॅली" महापालिका प्रांगणातून चोपडा कोर्ट मार्गे डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक पर्यंत काढण्यात आली व येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विराट आंबे स्पोर्ट क्लब, उल्हासनगर-3 येथे आणण्यात आली. सदर रॅलीत "हर घर तिरंगा, पर्यावरण जनजागृती, आरोग्य व स्वच्छता जनजागृती" करण्यात आली.

विराट आंबे स्पोर्ट क्लब येथे उल्हासनगर शहर स्थापनेच्या कोनशिलेला पुष्पहार अर्पण करण्यात आले. सर्व पान 3 वर ▶▶▶












## शहापुरच्या माहुली गडावर दोन पर्यटक भरकटले

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर / दि 8 :** माहुली किल्ल्यावर भरकटलेल्या दोन पर्यटकांना शहापूर पोलिसांच्या मदतीने सुखरूप खाली आणण्यात जीवरक्षक टीमला यश आले आहे. गुरुवारी सकाळी ८ वाजता शहापूर तालुक्यातील माहुली किल्ल्यावर पर्यटनास गेलेले दोन तरुण रस्ता चुकल्याने किल्ल्यावर भरकटले होते.

पवई येथील रजित झा (१९) व मलाड येथील आमिर आली (२०) हे दोघे शुक्रवारी पर्यटनासाठी माहुली येथे आले होते. सकाळी आठच्या सुमारास त्यांनी माहुलीगड चढण्यास सुरुवात केली. अर्धा गड चढून गेल्यावर त्यांना पुढील रस्ता दिसेनासे झाला.

जंगल आणि दरी शिवाय त्यांना काहीच दिसत नसल्याने त्यांची तारांबळ उडाली, त्यांना गडावरून खाली येण्याचा मार्ग सापडत नव्हता. आपण भरकटले असल्याचे त्यांच्या लक्षात येताच त्यांनी एसओएस ११२ क्रमांकावर कॉल केला व त्यांनी शहापूर पोलिसांना फोन केला. तात्काळ शहापूर पोलिसांनी जीवनरक्षक टीमचे अध्यक्ष समीर चौधरी यांच्याशी संपर्क साधला. यावेळी जीवरक्षक टीमच्या रघुनाथ आगिवले आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी पर्यटकांना बाहेर काढण्यास मदत केली.

> **जीवरक्षक टीमचे कार्य कौतुकास्पद आहे. प्रत्येक गड व किल्ल्याचा आपला असा इतिहास असून प्रत्येकाचे आपले वेगळे भौगोलिक महत्व आहे. त्यामुळे पर्यटकांनी आपण ज्या पर्यटनस्थळी जाणार आहोत तेथील भौगोलिक माहिती घेऊनच जावे. तसेच प्रशासनाकडून दिलेल्या सूचनांचे पालन करावे.**
>
> - परमेश्वर कासुले
> तहसीलदार

## ॐ गीतासार



### अध्याय १८
### मोक्षसंन्यासयोगः

यदग्रे चानुबन्धे च सुखं मोहनमात्मनः । निद्रालस्यप्रमादोत्थं तत्तामसमुदाहृतम् ॥ १८-३९ ॥

जे सुख भोगकाळी आणि परिणामीही आत्म्याला मोह पाडणारे असते, ते झोप, आळस व प्रमाद यांपासून उत्पन्न झालेले सुख तामस म्हटले आहे. ॥ १८-३९ ॥

न तदस्ति पृथिव्यां वा दिवि देवेषु वा पुनः । सत्त्वं प्रकृतिजैर्मुक्तं यदेभिः स्यात्त्रिभिर्गुणैः ॥ १८-४० ॥

पृथ्वीवर, आकाशात किंवा देवांत तसेच यांच्याशिवाय इतरत्र कोठेही असा कोणताच प्राणी किंवा पदार्थ नाही की, जो प्रकृतीपासून उत्पन्न झालेल्या या तीन गुणांनी रहित असेल. ॥ १८-४० ॥

ब्राह्मणक्षत्रियविशां शूद्राणां च परन्तप । कर्माणि प्रविभक्तानि स्वभावप्रभवैर्गुणैः ॥ १८-४१ ॥

हे परंतपा (अर्थात शत्रुतापना अर्जुना), ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र यांची कर्मे स्वभावतः उत्पन्न झालेल्या गुणांमुळे निरनिराळी केली गेली आहेत. ॥ १८-४१ ॥

शमो दमस्तपः शौचं क्षान्तिरार्जवमेव च । ज्ञानं विज्ञानमास्तिक्यं ब्रह्मकर्म स्वभावजम् ॥ १८-४२ ॥

अंतःकरणाचा निग्रह, इंद्रियांवर ताबा ठेवणे, धर्मासाठी कष्ट सहन करणे, अंतर्बाह्य शुद्ध राहणे, दुसऱ्यांच्या अपराधांना क्षमा करणे, मन, इंद्रिये व शरीर सरळ राखणे, वेद, शास्त्र, ईश्वर व परलोक इत्यादींवर विश्वास ठेवणे, वेदशास्त्रांचे अध्ययन-अध्यापन करणे आणि परमात्मतत्त्वाचा अनुभव घेणे, ही सर्वच्या सर्व ब्राह्मणाची स्वाभाविक कर्मे आहेत. ॥ १८-४२ ॥

## रेसिपी
### नारळी भात



**साहित्य**

शिजवलेला भात- 2 कप
खवलेले ओले खोबरे- 1 कप
ड्रायफ्रूट- आवडीप्रमाणे
केशर घातलेले दूध- पाव कप
साखर- 1 कप
वेलची पावडर- 1 छोटा चमचा
वेलची- 2/3
दालचिनी
लवंग- 3/4
तूप- 4 चमचे

**कृती**

प्रथम कढईमध्ये तूप गरम करा. त्यात वेलची, लवंग, दालचिनी घालून परतून घ्या.
आता यामध्ये खवलेले खोबरे घालून देखील परतून घ्या.
खोबरे परतून झाल्यावर त्यात साखर घाला.
साखर विरघळल्यावर त्यात ड्रायफ्रूट घाला.
आता सर्व मिश्रण परतल्यावर त्यात शिजवलेला भात घाला.
त्यात केसर घातलेले दूध, वेलची पावडर घालून परतून घ्या.
झाकण ठेवून 5 ते 7 मिनिटे वाफ काढून घ्या.
गरमागरम नारळी भात खाण्यासाठी तयार आहे.

# रक्षाबंधन




राखी हा एक प्राचीन हिंदू सण आहे. २०२५ मध्ये, उत्तर प्रदेश, गुजरात, राजस्थान, मध्य प्रदेश आणि हरियाणामध्ये रक्षाबंधन ही सार्वजनिक सुट्टी आहे. पहिल्या भागात सांगितल्याप्रमाणे, राखीचा सण भाऊ आणि बहिणींमधील बंधनाचे उत्सव साजरा करतो.

भावंडांमधील कर्तव्य आणि प्रेमाची संकल्पना सार्वत्रिक असल्याने हा सण देशातील अनेक संस्कृतींमध्ये खूप प्रसिद्ध आहे. सणाच्या दिवशी सकाळी, भाऊ आणि बहिणी त्यांच्या कुटुंबासह एकत्र येतात. बहिणी संरक्षणाचे प्रतीक म्हणून राखी बांधतात.

शेजारी आणि मित्रांमधील इतर नातेसंबंध साजरे करण्यासाठी राख्यांचा वापर केला जातो.

**रक्षाबंधन - एक पावसाळी सण**

रक्षाबंधन हा पावसाळी सण आहे, ज्याचा अर्थ खोलवर आहे. पावसाळा जीवनातील सर्व घाण आणि गोंधळ दूर करतो. हा ऋतू आपल्याला समृद्धी आणि जीवनाचा पूर्ण आनंद घेण्यासाठी एक नवीन आशा देतो. म्हणूनच श्रावण महिना भावंडांमधील प्रेमाच्या निर्दोष बंधनाचा आणि सौभाग्याच्या आगमनाचा उत्सव साजरा करण्यासाठी पवित्र मानला जातो.

**रक्षाबंधनामागील कहाणी**

रक्षाबंधन, ज्याला राखी किंवा राखी म्हणूनही ओळखले जाते, हा जगभरातील हिंदूंनी भाऊ आणि बहिणींमधील प्रेम आणि जबाबदारीच्या बंधनाचा सन्मान करण्यासाठी साजरा केलेला एक आनंददायी सण आहे. तथापि, या सणाचे महत्त्व जैविक नातेसंबंधांच्या पलीकडे जाते, कारण ते सर्व लिंग, धर्म आणि वांशिक पार्श्वभूमीच्या लोकांना एकत्र आणून विविध प्रकारचे प्लेटोनिक प्रेम साजरे करते.

' रक्षाबंधन ' या शब्दाचा संस्कृतमध्ये 'संरक्षणाची गाठ' असा अनुवाद होतो. जरी या सणाशी संबंधित विधी वेगवेगळ्या प्रदेशांमध्ये वेगवेगळे असू शकतात, तरी त्या सर्वांमध्ये एक धागा बांधण्याचा समावेश असतो. बहीण किंवा बहिणीसारखी व्यक्ती तिच्या भावाच्या मनगटाभोवती एक रंगीत आणि कधीकधी गुंतागुंतीचा धागा बांधते, जो तिच्या प्रार्थना आणि त्याच्या संरक्षणासाठी शुभेच्छांचे प्रतीक आहे. त्या बदल्यात, भाऊ आपल्या बहिणीला एक अर्थपूर्ण भेट देतो.

रक्षाबंधनाची उत्पत्ती प्राचीन काळापासून झाली आहे. या सणाचे संदर्भ अलेक्झांडर द ग्रेटशी संबंधित ३२६ ईसापूर्व काळातील दंतकथांमध्ये आढळतात. हिंदू धर्मग्रंथांमध्येही रक्षाबंधनाचे अनेक वर्णन आढळतातः

अशीच एक कथा इंद्राची पत्नी सची हिने बलि या शक्तिशाली राक्षसाशी झालेल्या युद्धादरम्यान इंद्राच्या मनगटाभोवती एक दोरा बांधला होता. या कथेवरून असे सूचित होते की प्राचीन भारतात पवित्र धागे युद्धात जाणाऱ्या पुरुषांना संरक्षण देण्यासाठी ताबीज म्हणून वापरले जात होते आणि ते केवळ भाऊ-बहिणीच्या नात्यापुरते मर्यादित नव्हते.

भागवत पुराण आणि विष्णू पुराणातील आणखी एका आख्यायिकेनुसार, विष्णूने राजा बळीचा पराभव करून तिन्ही लोक जिंकल्यानंतर, राजा बळी विष्णूला त्याच्या राजवाड्यात राहण्याची विनंती करतो. विष्णूची पत्नी, देवी लक्ष्मी, ही व्यवस्था नाकारते आणि राजा बळीला राखी बांधते आणि त्याला आपला भाऊ बनवते. या हावभावाने प्रभावित होऊन, राजा बळी तिची इच्छा पूर्ण करते आणि लक्ष्मी विष्णूला घरी परतण्याची विनंती करते.

दुसऱ्या एका कथेत, गणेशाची बहीण, देवी मनसा, रक्षाबंधनाच्या दिवशी त्याला भेटायला येते आणि त्याच्या मनगटावर राखी बांधते. यामुळे गणेशाचे पुत्र शुभ आणि लाभ यांना प्रेरणा मिळते, जे रक्षाबंधनाच्या उत्सवात सहभागी होऊ इच्छितात परंतु बहिणीशिवाय त्यांना एकटे वाटले जाते. ते गणेशाला बहीण देण्यास राजी करतात, ज्यामुळे संतोषी माँची निर्मिती होते. तेव्हापासून, तिन्ही भावंडे दरवर्षी एकत्र रक्षाबंधन साजरे करतात.

त्यांच्या घनिष्ठ मैत्रीसाठी ओळखले जाणारे कृष्ण आणि द्रौपदी, रक्षाबंधनाच्या वेळी एक महत्त्वाचा क्षण सामायिक करतात. युद्धात जेव्हा कृष्णाच्या बोटाला दुखापत होते, तेव्हा द्रौपदी त्याच्या जखमेवर मलमपट्टी करण्यासाठी तिच्या साडीचा तुकडा फाडते. तिच्या प्रेमाच्या कृतीने प्रभावित होऊन, कृष्ण तिच्या दयाळूपणाची परतफेड करण्याचे वचन देतो. नंतर, एका कठीण क्षणी द्रौपदीच्या मदतीला येऊन कृष्ण आपले वचन पूर्ण करतो.

शिवाय, महाभारतात, द्रौपदी कृष्णाला महायुद्धात जाण्यापूर्वी राखी बांधते. त्याचप्रमाणे, पांडवांची आई कुंती, तिचा नातू अभिमन्यू स्वतःच्या युद्धाला निघण्यापूर्वी त्याला राखी बांधते.

या कथा रक्षाबंधनाशी संबंधित समृद्ध सांस्कृतिक महत्त्व आणि वैविध्यपूर्ण कथांवर प्रकाश टाकतात, जैविक नातेसंबंधांच्या पलीकडे असलेल्या प्रेम आणि संरक्षणाच्या खोल बंधांचे प्रदर्शन करतात.

**शेतकऱ्यांसाठी रक्षाबंधनाचे महत्त्व**

भारतातील विविध प्रदेशातील शेतकरी समुदायासाठी, राखी पौर्णिमेच्या दिवशी होणाऱ्या श्रावणीच्या समारंभाचे विशेष महत्त्व आहे. चांगला कापणीचा हंगाम हा मुबलक पावसाच्या पाण्यावर अवलंबून असतो. शेतीसाठी पुरेसे पाणी मिळण्यासाठी पावसाळा हा सर्वोत्तम काळ आहे. म्हणूनच, बिहार, मध्य प्रदेश आणि झारखंड सारख्या राज्यांमधील शेतकरी मातीला तिच्या फलदायीतेसाठी प्रेम करतात. हाच उत्सव २०२५ च्या राखी सणाच्या वेळी साजरा केला जातो.



**राखी पौर्णिमा - नवीन आयुष्याची सुरुवात**

पावसाळा हा विनाशाचे प्रतीक देखील आहे. तो निसर्गातील अनावश्यक पैलू पूर्णपणे काढून टाकतो आणि एका नवीन जीवनाची सुरुवात दर्शवितो. राखी पौर्णिमा हा सण भारतातील गुजरात राज्यात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो.

**दरवर्षी रक्षाबंधनाची तारीख कशी मोजली जाते?**

रक्षाबंधन हा सण हिंदू कॅलेंडरनुसार साजरा केला जातो , नियमित (ग्रेगोरियन) कॅलेंडरनुसार नाही. दरवर्षी ही तारीख बदलते कारण ती श्रावण महिन्याच्या पौर्णिमेला (पौर्णिमा) येते , जी सहसा जुलै किंवा ऑगस्टमध्ये येते .

**तारीख कशी ठरवली जाते ते येथे आहे:**

श्रावण महिन्यातील पौर्णिमेच्या दिवशी हा उत्सव साजरा केला जातो .

भद्रा नावाचा अशुभ काळ टाळणे महत्वाचे आहे . म्हणून, राखी शुभ मुहूर्तावर बांधली जाते , जो दिवसाचा सर्वोत्तम काळ असतो.

अचूक तारीख आणि वेळ शोधण्यासाठी हिंदू पुजारी किंवा पंचांग (ज्योतिषीय कॅलेंडर) वापरले जातात.

उदाहरणार्थ, २०२५ मध्ये , रक्षाबंधन ९ ऑगस्ट २०२५ रोजी साजरा केला जाईल कारण तो श्रावण महिन्यातील पौर्णिमेचा दिवस आहे.

**राखी - बदलाचा उत्सव**

पावसाळ्यातील पावसाळा हा बदल देखील दर्शवितो, जो नवीन मार्गासाठी मार्ग मोकळा करण्यासाठी आवश्यक आहे. म्हणूनच, ओरिसा, केरळ, आंध्र प्रदेश आणि तामिळनाडूमधील ब्राह्मण समुदाय श्रावण पौर्णिमेचा दिवस उपकार म्हणून पाळतो.

**रक्षाबंधनाची पूजाविधी**

भारत रक्षाबंधन साजरा करतो, हा एक शुभ प्रसंग आहे, ज्यामध्ये " पूजा विधी " नावाचा एक महत्त्वाचा विधी समाविष्ट आहे. पूजा विधी सुरू होण्यापूर्वी दिवा (तेलाचा दिवा), रोली (सिंदूर पावडर), तांदूळ, मिठाई आणि राखी भरलेली एक छोटी पूजा थाळी तयार केली जाते. बहिणी त्यांच्या भावांसमोर आरती करतात, गोलाकार पद्धतीने दिवा हलवतात आणि त्यांच्या कपाळावर रोली लावतात. त्यानंतर, ते भावाच्या मनगटाभोवती राखी बांधताना त्याच्या आरोग्यासाठी आणि यशासाठी प्रार्थना करतात. त्या बदल्यात, भाऊ त्यांच्या बहिणींना त्यांच्या प्रेमाचे प्रतीक म्हणून भेटवस्तू देतात आणि त्यांना सर्व प्रकारच्या संकटांपासून वाचवण्याची प्रतिज्ञा करतात.

पूजा विधी एक आध्यात्मिक वातावरण वाढवते जे भावंडांचे बंधन अधिक घट्ट करते आणि प्रेम आणि संरक्षणासाठी समर्पित रक्षा बंधन २०२५ चे महत्त्व अधोरेखित करते.

**संपूर्ण भारतात रक्षाबंधन साजरे**

या प्रसंगी, एक बहीण तिच्या भावाच्या कपाळावर तिलक लावते, आरती करते आणि त्याच्या मनगटावर राखी बांधते, जे त्यांच्यातील खोल नात्याचे प्रतीक आहे. परस्पर व्यवहारात, भाऊ आपल्या बहिणीला विशेष प्रतीके देतो, तसेच सर्व परिस्थितीत तिचे रक्षण आणि आधार देण्याची वचनबद्धता दर्शवतो.

राजस्थानी आणि मारवाडी समाजात, एक विशिष्ट परंपरा प्रचलित आहे - भावाच्या जोडीदाराच्या बांगडीवर 'लुंबा राखी' बांधणे. ही प्रथा या श्रद्धेतून निर्माण झाली आहे की पत्नी विवाहातील जोडीदाराचे प्रतिनिधित्व करते म्हणून, तिच्या सहभागाशिवाय हा सोहळा अपूर्ण राहतो. शिवाय, ती तिच्या पतीच्या बरोबरीने बहिणीचे कल्याण सुनिश्चित करण्याची जबाबदारी घेते. ही प्रथा हळूहळू इतर विविध भारतीय समुदायांमध्येही लोकप्रिय होत आहे.

**रक्षाबंधन विधी प्रक्रिया**

भारतात साजरा केला जाणारा एक आदरणीय उत्सव, रक्षाबंधन, 'पूजा विधी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या एका महत्त्वपूर्ण औपचारिक पद्धतीचा समावेश आहे. पूजा विधी एका साध्या पूजा थाळीच्या व्यवस्थेने उलगडते, ज्यामध्ये तेलाचा दिवा (दीया), सिंदूर पावडर (रोली), तांदळाचे दाणे, मिठाई आणि राखी असते. बहिणी आरती करून, त्यांच्या भावांसमोर वर्तुळाकार हालचालीत दिवा हलक्या हाताने हलवून आणि त्यांच्या कपाळावर रोलीचा टिळक लावून विधीची सुरुवात करतात. त्यानंतर, ते त्यांच्या भावांच्या मनगटाभोवती नाजूकपणे राखी बांधतात, त्यांच्या समृद्धीसाठी आणि कल्याणासाठी मनापासून प्रार्थना करतात. त्या बदल्यात, भाऊ त्यांच्या बहिणींना भेटवस्तू देतात, त्यांच्या प्रेमाचे प्रतीक आहेत आणि सर्व आव्हानांपासून त्यांचे रक्षण करण्याची प्रतिज्ञा करतात. पूजा विधी आध्यात्मिक वातावरण स्थापित करते, भावंडांचे बंधन मजबूत करते आणि प्रेम आणि पालकत्वाच्या आनंदाच्या रूपात रक्षा बंधन २०२५ चे गहन महत्त्व अधोरेखित करते.

# कल्याणात नारळी पौर्णिमेनिमित्त पारंपरिक मिरवणूक

## आगरी कोळी समाज उत्कर्ष मंडळाचे आयोजन

### कल्याण पश्चिमेतील छत्रपती शिवाजी महाराज चौकातून एका भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते.

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : आगरी कोळी समाज उत्कर्ष मंडळाच्या वतीने कल्याणात पारंपरिक नारळी पौर्णिमेचा उत्सव साजरा करण्यात आला. कल्याण पश्चिमेतील छत्रपती शिवाजी महाराज चौकातून एका भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते.

या नारळी पौर्णिमा शोभायात्रेत आसपासच्या परिसरातील आगरी कोळी बांधव पारंपरिक वेशभूषा धारण करून सहभागी झाले होते. संस्कृतिक देखावे, सजलेली होडी, बैलगाड्या, ब्रास बॅन्ड आणि मोठा सोन्याचा नारळ हे शोभायात्रेचे आकर्षण होते. मिरवणुकीत बॅन्ड, ढोल, ताशाच्या गजरात व कोळीगीतांच्या तालावर कोळी बंधु, भगिनी, आबालवृध्द नाचत कोळी पोशाखात सहभागी होऊन दर्या राजाला नारळ अर्पण करण्यासाठी सहभागी झाले होते. दुर्गाडी किल्ल्यासमोरील गणेशघाटावर दर्यासागराची व सोन्याच्या नारळाची विधिवत पूजा करून दर्याला नारळ अर्पण करण्यात आला असल्याची माहिती आमदार विश्वनाथ भोईर यांनी दिली.



## पवित्र रक्षाबंधन ..



रक्षाबंधनाचे सोहळे
सुस्वागतम् प्रत्युद्गम
निरागस स्नेह साक्ष
मना न किंतू संभ्रम

बहिणा बाई कौतुक
जुळले स्वर ह्रिदम
निरामय अंतःकरण
मनी प्रेमाची सरगम

स्नेहळनितळसरिता
हृदयात होतो उगम
आजकालच्या जगा
नाती टिकवणे दुर्गम

रक्षाबंधन सम सणा
वात्सल्य सुख संगम
निस्पृह प्रेमचं स्थावर
आयुष्य अवघे जंगम

प्राचिन परंपरा उत्तम
आरंभ असे अनागम
हजारो ग्रंथ वाचे जरी
नाते ना कळे अनुगम

निरांजने उजळता ती
कर्तव्याचे हो अवगम
सुखाचे करी स्वागत
दुःखाचे सहज निर्गम

**हेमंत मुसरीफ पुणे, 9730306996.**

# कल्याणमध्ये 'ज्याचा त्याचा विठ्ठल' कार्यक्रम

### डॉक्टर समीर कुलकर्णी यांचे लेखन असून कार्यक्रमाचे दिग्दर्शन अमित वझे यांनी केले आहे.

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : क्रिसिंडो कल्लाकार तर्फे वर्षपूर्ती निमित्त रविवार दिनांक १७ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता कल्याण मधील अत्रे रंगमंदिर येथे "ज्याचा त्याचा विठ्ठल" हा नावीन्यपूर्ण कार्यक्रम सादर केला जाणार आहे. आत्तापर्यंत "ले चली तकदीर", "भाडिपा प्रस्तुत स्टँडअप कॉमेडी" तसेच "तो बहिर्जी होता" यांसारखे वेगळ्या धाटणीचे कार्यक्रम क्रीसिंडो कल्लाकार नी कल्याणकारांसाठी सादर केले आहेत.

डॉक्टर समीर कुलकर्णी यांचे लेखन असून कार्यक्रमाचे दिग्दर्शन अमित वझे यांनी केले आहे. आई कुठे काय करते या मालिकेतील सुप्रसिद्ध अभिनेत्री मधुराणी गोखले आणि त्यांचे सहकलाकार याचे सादरीकरण करणार आहेत.

"ज्याचा त्याचा विठ्ठल" हे एक संगीत-चित्र- नाट्य अभिवाचन आहे जे कोणालाही भक्ती आणि आत्म-भानाच्या वाटेवर घेऊन जातं.

विठ्ठल.. हा नुसता देवळात कटेवर हात ठेवून उभा असलेला देव नाही तर तो या चराचर सृष्टीतल्या प्रत्येक घटकात आहे.. असतोच.. मनाची दारं हळू हळू उघडत गेली की तो आपल्या समोर वेगवेगळ्या रुपात साकार होत राहतो.. नकारात्मकतेला सकारात्मकतेने भरून टाकतो.. हा प्रवास नकळत घडणारा आहे, हा विठ्ठल विचारात आहे, आचारात आहे.. हा 'ज्याचा त्याचा विठ्ठल' आहे, तो ज्यांनं त्यानं मिळवायचा आहे. त्याच्यापर्यंत पोहोचण्यासाठीची परिस्थितीही तोच निर्माण करतो. फक्त माणसाने त्याचा स्वीकार करण्याची आवश्यकता आहे.

हिंसे पासून सुरू होणारा सौदामिनीचा हा प्रवास, खरंच बघण्यासारखा आहे, अनुभवण्यासारखा आहे. प्रभावी कथन, भारावून टाकणारं संगीत अणि प्रसिद्ध चित्रकार मिलिंद मुळिक यांची बोलकी जलरंगातली चित्र आहेत, जी कथनाला दृश्य परिणाम देतात, ही त्रयी ही या प्रयोगाची अविभाज्य अंगआहेत. "ज्याचा त्याचा विठ्ठल" हा एक उत्कट, अंतर्मुख अणि समृद्ध करणारा अनुभव आहे.

या कार्यक्रमाला सुद्धा कल्याण डोंबिवलीकर उत्स्फूर्त प्रतिसाद देतील असे क्रिसिंडो कल्लाकार चे मेघ दांडेकर यांनी सांगितले.

## आजचे राशि भविष्य




**मेष**
अभ्यास आणि अध्यापनाशी संबंधित लोकांसाठी आजचा दिवस चांगला आहे. तुम्हाला लवकरच मोठे यश मिळणार आहे.तुमचे कौटुंबिक जीवन आनंदी राहील.

**वृषभ**
आजचा दिवस आनंदात व्यतीत कराल. तुम्हाला तुमच्या मुलाकडून एखादी चांगली बातमी मिळेल.तुमचे मन प्रसन्न राहील. शैक्षणिक कार्यात यश मिळेल.

**मिथुन**
व्यवसाय करणाऱ्यांना चांगल्या कंपनीत सहभागी होऊन व्यवसाय वाढवण्याची सुवर्णसंधी मिळेल. व्यवसायाशी संबंधित प्रवास करावा लागेल.

**कर्क**
जुन्या जमिनीच्या मालमत्तेतून तुम्हाला चांगला नफा मिळेल. सरकारी क्षेत्रात चांगली नोकरी मिळेल. तुम्ही आणि तुमचे कुटुंब खूप आनंदी व्हाल.

**सिंह**
व्यावसायिकांसाठी दिवस चांगला आहे.या काळात तुम्ही तुमचे आरोग्य सुधारण्याचा प्रयत्न कराल.नोकरीत पदोन्नती तसेच उत्पन्नात वाढ होण्याची शक्यता आहे.

**कन्या**
लेखन इत्यादी कार्यातून तुमचा मान-सन्मान वाढेल. कामाच्या ठिकाणी अधिकाऱ्यांशी सुसंवाद राखाल. प्रगतीच्या संधी मिळतील. खेळांमध्ये भाग घेऊ शकता.

**तूळ**
काही अनुभवी लोक भेटतील. ज्यामुळे तुम्हाला भविष्यात फायदा होईल. व्यवसायात चांगला नफा मिळेल. कार्यालयात सहकाऱ्यांशी चांगला समन्वय राहील.

**वृश्चिक**
अनावश्यक खर्च टाळावा.कामाच्या ठिकाणी तुम्ही तुमच्या कामात काही नवीन कल्पना आणाल. तुमच्या सकारात्मक वृत्तीमुळेच तुम्हाला नोकरीत बढती मिळेल.

**धनु**
तुमचे कौटुंबिक जीवन खूप आनंददायी असणार आहे. तुमचे ध्येय साध्य करण्यासाठी तुम्ही तयार असाल. तुमच्या वैवाहिक जीवनात सुंदर समन्वय राहील.

**मकर**
कठोर परिश्रम आणि सकारात्मक वर्तनाने कठीण परिस्थितीतून बाहेर पडाल. पैशाच्या व्यवहारात थोडे सावध राहा. तुमचे वैवाहिक जीवन चांगले राहील.

**कुंभ**
वरिष्ठ तुमच्या कामावर खूश होतील. बढती मिळण्याची शक्यता आहे. तुमचा पगारही वाढू शकतो. कामाच्या ठिकाणी घेतलेले निर्णय तुम्हाला चांगले परिणाम देतील.

**मीन**
आज अपेक्षेपेक्षा जास्त लाभ होण्याची शक्यता आहे. वैवाहिक संबंध मजबूत करण्यासाठी जोडीदाराला भेटवस्तू द्याल. नकारात्मक विचार टाळले पाहिजेत.


जीवनदीप महाविद्यालय गोवेली ता. कल्याण
मुंबई विद्यापीठाशी संलग्न, नॅक मूल्यांकन प्राप्त
प्रवेश सुरू (२०२५•२६)
पदवी नंतर पत्रकारितेत करिअर करण्याची सुवर्णसंधी
एम.ए (एमसीजे)
(मास्टर ऑफ जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन)
-पात्रता-
कोणत्या शाखेतून पदवी उत्तीर्ण
- करिअर व्यवसाय व नोकरीची संधी -
टीव्ही चॅनेल्स, वृत्तपत्र, मॅग्झिन, रेडिओ, वेब मीडिया, जनसंपर्क, जाहिरात, चित्रपट निर्मिती, डिजिटल मीडिया या क्षेत्रांमध्ये संधी .
- प्रवेशासाठी संपर्क -
९४२१०५९३९६
goveli_jssp@rediffmail.com
www.jeevandeepcollegegoveli.in



जीवनदीप शैक्षणिक संस्था, पोई संचलित
जीवनदीप महाविद्यालय, गोवेली
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गोवेली
मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मुल्यांकन (B- Grade) प्राप्त
११ वी व १२ वी
कला, वाणिज्य, विज्ञान (IT / CS)
UNDER GRADUATION: B.Sc Data Science, B.Sc IT, B.Sc Chemistry Maths, BMS, BAF, B.Com, BAMMC, B.A.
POST GRADUATION: M.Sc IT, M.Sc Chemistry, M.Com Advanced Accountancy, MAMMC, M.A. Marathi, M.A. Economics, M.A. History, M.A. Sociology, M.A. Geography
Admission Open 2025-2026
आपलं कॉलेज, हक्काचं कॉलेज
आजच आपला प्रवेश निश्चित करा!
7775851123, 8108559566
9619188558

# नेवाळी चौक परिसरात अमली पदार्थ जप्त

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर /वार्ताहर :** शहरात अमली पदार्थांच्या वाढत्या साखळीवर उल्हासनगर गुन्हे शाखेने पुन्हा एकदा कारवाई केली आहे. नेवाळी चौक परिसरात बंद असलेल्या ढाब्यात विक्रीसाठी आणलेले ७१ ग्रॅम एमडी अमली पदार्थ एका महिलेच्या ताब्यातून जप्त करण्यात आले आहे. बाजारभावानुसार याची किंमत १४ लाख ३१ हजार १२० रुपये आहे.

उल्हासनगर गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक योगेश आव्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने सोमवारी (ता. ४) सायंकाळच्या सुमारास नेवाळी चौक परिसरात ही कारवाई केली. काटईकडे जाणाऱ्या रस्त्यालगत असलेल्या एका बंद ढाब्यावर एक महिला एमडी विक्रीसाठी आणणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्याअनुषंगाने पोलिसांनी सापळा रचत तातडीने छापा टाकला. नौशिन मैनुद्दीन शेख या महिलेला रंगेहाथ अटक केली. तिच्याकडून ७१ ग्रॅम एमडी हस्तगत केले असून, बाजारातील किंमत जवळपास १४ लाख ३१ हजार १२० रुपये एवढी असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. पोलिसांनी चौकशी केली असता, तिने इम्रान हबीब खान याच्याकडे अमली पदार्थ खरेदी केल्याचे उघड झाले. सध्या पोलिस इम्रान खानचा शोध घेत आहेत. त्याच्यावर गुन्हा दाखल केला असून, तो फरार आहे.

# 'सरपंच संवाद' ॲप मुळे ग्रामविकासाला गती मिळणार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पालघर / बातमीदार**

ग्रामीण भागातील विविध गावांमध्ये झालेल्या नावीन्यपूर्ण कामांची माहिती एकमेकांपर्यंत पोहोचवण्यासाठी, तसेच ग्रामविकास अधिक गतिमान व परिणामकारक करण्याच्या उद्देशाने 'सरपंच संवाद' हे मोबाईल ॲप सुरू करण्यात आले आहे. स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) आणि जलजीवन मिशन या दोन महत्त्वाकांक्षी योजनांच्या उद्दिष्टांना पूरक ठरणारे हे ॲप एक प्रभावी डिजिटल साधन ठरणार आहे.

जलशक्ती मंत्रालयातर्फे आयोजित 'स्वच्छ व सुजल ग्रामसाठी नेतृत्व' या विशेष कार्यक्रमात जलशक्तिमंत्री सी. आर. पाटील यांच्या हस्ते या ॲपचे उद्घाटन करण्यात आले. या ॲपच्या माध्यमातून ग्रामपंचायतीच्या कारभारात पारदर्शकता, संवाद आणि नवोपक्रमांची देवाणघेवाण वाढवणे हा मुख्य उद्देश आहे. 'सरपंच संवाद' अॅपमुळे सरपंच आपल्या गावातील यशस्वी उपक्रमांची माहिती देशभरातील इतर सरपंचांपर्यंत पोहोचवू शकतात. तसेच इतर गावांतील यशोगाथा पाहू शकतात, विविध विषयांवरील प्रशिक्षण घेऊ शकतात, महत्त्वाच्या बातम्यांची माहिती मिळवू शकतात आणि ऑनलाइन प्रमाणपत्रदेखील प्राप्त करू शकतात.

या ॲपबाबत माहिती देताना जिल्हा पाणी स्वच्छता मिशनचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी अतुल पारसकर यांनी सांगितले, की हे ॲप स्वच्छ भारत मिशन आणि जलजीवन मिशन या दोन्ही अभियानांच्या उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी एक परिणामकारक डिजिटल मंच ठरणार आहे.

पालघर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांनी सरपंचांना आवाहन केले आहे, की या ॲपचा नियमित आणि प्रभावी वापर करून गावांचा स्वच्छ, सुजल व शाश्वत विकास साधावा. जिल्ह्यातील सर्व सरपंचांनी 'सरपंच संवाद' हे ॲप आपल्या मोबाईलमध्ये तत्काळ डाऊनलोड करून ग्रामविकासाच्या प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा.

## घोडबंदर मार्गावर अवजड वाहनांना ११ ऑगस्ट पर्यंत बंदी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भाईंदर :** घोडबंदर मार्गावरील ठाण्याहून येणाऱ्या घाट रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे काम मिरा-भाईंदर महापालिकेकडून हाती घेतले जाणार आहे. याच पार्श्वभूमीवर मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या वाहतूक विभागाने घोडबंदर मार्गावर अवजड वाहनांच्या वाहतुकीवर बंदी घातली आहे. ८ ऑगस्टपासून ११ ऑगस्टच्या पहाटेपर्यंत ही बंदी लागू राहणार आहे. याच मार्गावरून राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) तसेच महापालिकांच्या परिवहन विभागाच्या बसेस देखील नियमितपणे धावत असतात. मात्र, पावसाळ्यात या मार्गावर खड्ड्यांचे प्रमाण वाढते आणि त्यामुळे वाहतूक कोंडी होऊन वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागतो.

# स्मार्ट रक्षाबंधनाकडे बहिणींचा कल

## स्मार्ट राखीतून कोट्यवधींची उलाढाल



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण, ता. ७ :** रक्षाबंधन हा बहीण-भावाच्या अतूट प्रेमाचा सण. यंदा शनिवारी (ता. ९) हा सण साजरा होत आहे. त्यामुळे शहरातील बाजारपेठांमध्ये राखी खरेदीसाठी काही प्रमाणात गर्दी दिसत असली तरी बदलत्या तंत्रज्ञानामुळे 'स्मार्ट रक्षाबंधन' साजरा करण्याकडे अनेकांचा कल वाढत आहे. विशेषतः सासरी असलेल्या किंवा दूर राहणाऱ्या बहिणी आता ऑनलाइन राख्यांद्वारे भावाशी नाते जपताना दिसत आहेत. त्यामुळे यंदा राखी व्यवसाय अंदाजे १७हजार कोटी रुपयांवर पोहोचण्याची शक्यता व्यापारी संघटनांनी व्यक्त केली आहे.

सणाचे आधुनिक स्वरूप लक्षात घेता २०१८मध्ये राखी व्यवसाय सुमारे तीन हजार कोटी रुपये इतका होता; मात्र सात वर्षांत तो वाढून यंदा अंदाजे १७ हजार कोटी रुपयांवर पोहोचण्याची शक्यता आहे. त्यातील सुमारे १,२०० कोटी रुपयांची राखीविक्री केवळ ऑनलाइन माध्यमातून होणार असल्याचे व्यापार संघटनांनी नमूद केले आहे.

राखी व्यवसाय मागील सात वर्षांत तब्बल पाचपट वाढला आहे. राखी खरेदीसाठी यंदा विविध ई-कॉमर्स कंपन्यांची विशेष तयारी आहे. दूर अंतरावर राहणाऱ्या बहिणी थेट भावाच्या पत्त्यावर राखी पाठवू शकतात. त्याचप्रमाणे भावाकडूनही डिजिटल गिफ्ट कार्ड, खरेदी कूपन यांचे प्रमाण वाढले आहे. वेळ, कुरिअरचा खर्च आणि प्रवास टाळता येत असल्याने डिजिटल माध्यमांमध्ये पसंती मिळते आहे.

**आमच्या दुकानातून अनेक वर्षांपासून आम्ही राख्या विकत आहोत. बदलत्या काळानुसार आता दोन वर्षांपासून ऑनलाइन विक्रीदेखील सुरू केली आहे. यंदा दुकानातून ४००-४५० राख्यांची विक्री झाली असून, ३००-३५० राख्या ऑनलाइन विकल्या गेल्या आहेत. ऑनलाइन विक्रीचे प्रमाण दरवर्षी वाढत असल्याने नुकसान टाळण्यासाठी दोन्ही पर्याय आम्ही ठेवले आहेत.**
- गणेश चंद्रकांत पंडित, व्यावसायिक

**********************

**विविध डिजिटल माध्यमांवरील सवलतीमुळे राख्यांची ऑनलाइन डिलिव्हरी सुरू आहे. त्यामुळे दुकानदारांना मोठा फटका बसत असून, दुकानात राखी खरेदीसाठी गर्दी कमी झाली आहे.**
- ओमकार चासकर, ग्राहक

# विरार शहरातील रखडलेल्या कामांना गती द्या

## बविआच्या शिष्टमंडळाचे आयुक्तांना निवेदन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**विरार, ता. ७ (बातमीदार)**

बहुजन विकास आघाडीचे संघटक सचिव अजीव पाटील व माजी सभापती पंकज ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने बुधवारी (ता. ६) वसई-विरार महापालिकेचे नवनियुक्त आयुक्त मनोजकुमार सूर्यवंशी यांची भेट घेतली. शहरातील वाहतूक कोंडी, रस्तेदुरुस्ती, नळजोडणी वितरण, तलाव आणि उद्यानांचे सुशोभीकरण, प्रस्तावित कामे अशा अनेक विषयांवर चर्चा केली. मागील काही दिवसांपासून विरार-पूर्व पश्चिमेला जोडणाऱ्या उड्डाणपुलाजवळ मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. आगामी सण-उत्सवांदरम्यान या वाहतूक कोंडीत आणखी भर पडणार आहे. या वाहतूक कोंडीमुळे वाहनधारकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागतो. शिवाय वेळ आणि इंधनाचाही अपव्यय होतो. त्यामुळे वाहतूक कोंडी दूर करण्याकरिता आवश्यक त्या उपाययोजना करण्यात याव्यात, अशी मागणी बविआ शिष्टमंडळाने आयुक्तांकडे केली.

येत्या काही दिवसांवर दहीहंडी व गणेशोत्सव आहे. त्याअगोदर शहरातील रस्त्यांवर पडलेले खड्डे बुजविण्यासाठी पॅचवर्कची कामे केली जावीत, अशा सूचनाही करण्यात आल्या. एमएमआरडीच्या सूर्या पाणीपुरवठा योजनेतून वसई-विरार महापालिकेला अतिरिक्त १८५ एमएलडी पाणी उपलब्ध झालेले आहे; परंतु पाण्याची आवश्यकता असलेल्या इमारतींना अद्याप नळजोडणी वितरित करण्यात आलेल्या नाहीत, याकडे आयुक्तांचे लक्ष वेधण्यात आले. नळजोडण्यांचे वितरण व अपूर्ण जलकुंभांची कामे तातडीने केली गेल्यास शहरवासीयांना दिलासा मिळू शकेल, असे शिष्टमंडळाने म्हटले आहे. शहरातील कचरा समस्या दूर करण्यासाठी गृहनिर्माण सोसायट्यांना डस्टबिनचे वाटप केले जावे आणि शहरातील सर्व तलावांतील गाळ काढून त्यांची दुरुस्ती आणि रंगरगोटी करण्यात यावी, अशी आग्रही मागणीही याप्रसंगी करण्यात आली.

बविआच्या या मागण्यांवर नवनियुक्त आयुक्तांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे, अशी माहिती संघटक-सचिव अजीव पाटील व माजी समिती सभापती पंकज ठाकूर यांनी दिली. बहुजन विकास आघाडीचे अध्यक्ष आमदार हितेंद्र ठाकूर, माजी आमदार क्षितिज ठाकूर, माजी महापौर राजीव पाटील यांच्या मार्गदर्शनातील या शिष्टमंडळात माजी स्थायी समिती सभापती प्रशांत राऊत, सखाराम महाडिक, प्रभाग समिती अ मधील माजी नगरसेवक-नगरसेविका आणि प्रभाग समिती ब मधील माजी नगरसेविका आणि कार्यकर्त्यांचा सहभाग होता.

### रुपेश भोईर यांच्या मागणीला यश

# कै. प्रकाश परांजपे अभ्यासिकेची सूत्रे केडीएमसीकडेच !

## शिवसेना ठाकरेगटामुळे स्पर्धा परीक्षेच्या विद्यार्थ्यांना दिलासा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



**कल्याण :** खाजगी संस्थेला दिलेली अभ्यासिका आता कल्याण डोंबिवली महानगरपालिकाच चालवणार असून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी केलेल्या मध्यस्थीमुळे स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे.

कल्याणमध्ये कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या मालकीची असलेली सहजानंद चौक येथील कै. प्रकाश परांजपे अभ्यासिका महापालिकेने खाजगी संस्थेला चालविण्यासाठी दिली होती. या खाजगी संस्थेने मनमानीपणे या अभ्यासिकेची माफक 200 रुपये असलेली फि वाढवण्याची घोषणा केली. याठिकाणी अभ्यासासाठी येणारे सर्व विद्यार्थी हे गरीब घरातले असल्याने ही वाढलेली फी भरणे त्यांना शक्य नव्हते. याबाबत या विद्यार्थ्यांनी शिवसेना ठाकरे गटाचे विधानसभा सहसंघटक रुपेश भोईर यांच्याकडे धाव घेत याप्रकरणी न्याय मिळवून देण्याची मागणी केली.

यानंतर रुपेश भोईर यांनी शिवसेना पदाधिकारी आणि विद्यार्थ्यांसह केडीएमसी मुख्यालयात जाऊन अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे यांची भेट घेत विद्यार्थ्यांची कैफियत मांडली. अभ्यासिकेत स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणारे सर्व विद्यार्थी हे गरीब कुटुंबातील असून अत्यंत हलाकीच्या परिस्थितीत अभ्यास करत आहेत. या अभ्यासिकेत अनेक समस्या असून तुटलेल्या खुर्च्या, पिण्याच्या पाण्याची सोय नाही, प्रसाधनगृहाचे दरवाजे तुटलेले आहेत. या अभ्यासिकेची दुरुस्ती महापालिकेने करण्याऐवजी पालिकेने खाजगी संस्थेला ही अभ्यासिका चालवायला दिली.

या खाजगी संस्थेने ही अभ्यासिका ताब्यात घेत आधी तर नूतनीकरण करण्याच्या नावाखाली अभ्यासिका काही दिवस बंद ठेवण्याची नोटीस लावली. तसेच माफक 200 रुपये असलेली फी कित्येक पटींनी वाढविण्याची घोषणा केली. हि सर्व बाब रुपेश भोईर यांनी अतिरिक्त आयुक्तांपुढे मांडून ही अभ्यासिका महापालिकेने चालविण्याची मागणी केली. याला सकारात्मक प्रतिसाद देत या अभ्यासिकेत आवश्यक असणाऱ्या सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याचे आश्वासन अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे यांनी उपस्थित शिवसेना पदाधिकाऱ्यांसह विद्यार्थ्यांना दिली. तर न्याय मिळवून दिल्या बद्दल विद्यार्थ्यांनी रुपेश भोईर यांचे आभार मानले आहेत.

**सहजानंद चौक येथील कै. प्रकाश परांजपे अभ्यासिका महापालिकेने खाजगी संस्थेला चालविण्यासाठी दिली होती. या खाजगी संस्थेने मनमानीपणे फि वाढवण्याची घोषणा केली. अभ्यासासाठी येणारे सर्व विद्यार्थी हे गरीब घरातले असल्याने ही वाढलेली फी भरणे त्यांना शक्य नव्हते. याबाबत तक्रार प्राप्त होताच अतिरिक्त आयुक्तांपुढे विषय मांडून न्याय देण्याची मागणी केली होती तिला पालिकेने सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.**
- रुपेश भोईर, विधानसभा सहसंघटक, शिवसेना ठाकरे गट

# जिल्हाधिकाऱ्यांचे स्वीय सहाय्यक मनोज भानुशाली यांचे निधन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



मा.जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांचे स्वीय सहाय्यक मनोज भानुशाली यांचे आज दि.08 रोजी हृदयविकाराने निधन झाले. मनोज भानुशाली नेहमी हसतमुख, सर्वांना अदबीने सहकार्य करणारे अधिकरी होते.

त्यांच्या अशा अकस्मात निधनाने जिल्हाधिकारी कर्मचारीवृंदावर शोककळा पसरली असून सर्वांच्यावतीने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे.

# रिक्षा चालकांनी अडवली रुग्णवाहिकेची वाट

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



कल्याण - कल्याण पश्चिम रेल्वे स्थानकाजवळ एका प्रवाशाच्या अंगावर रात्रीच्या वेळेत रिक्षा घालून प्रवाशाला जखमी करण्याचा प्रयत्न एका मुजोर रिक्षा चालकाने केला असल्याचा प्रकार दोन दिवसापूर्वी उघडकीला आला होता. आता डोंबिवली पूर्वेत रेल्वे स्थानकाजवळ पाटकर रस्त्यावर कॅनरा बँकेच्या समोरील भागात रिक्षा चालकांनी शुक्रवारी सकाळी एका रुग्णवाहिकेची वाट अडवून धरल्याचा प्रकार उघडकीला आला आहे.

रुग्णवाहिका चालकाला तातडीने एक रुग्ण घेण्यासाठी जायचे होते. रुग्णवाहिका चालक डोंबिवली पूर्व रेल्वे स्थानक भागातून पाटकर रस्त्याने शुक्रवारी सकाळी चालला होता. या रस्त्यावरील कॅनरा बँक एटीएमसमोर रुग्णवाहिका येताच येथे नेहमीप्रमाणे स्कायवॉकच्या उतरणीच्या मार्गावर मुख्य वर्दळीचा रस्ता अडवून काही मोजके रिक्षा चालक प्रवासी घेण्यासाठी उभे असतात. रिक्षा वाहनतळ सोडून उभ्या असलेल्या या रिक्षा चालकांमुळे पाटकर रस्त्याची एक बाजुची मार्गिका पूर्णपणे वाहतुकीसाठी आणि पादचाऱ्यांना येजा करण्यासाठी बंद असते.

रस्ता का बंद केला, असा प्रश्न या रिक्षा चालकांना केला तर ते संघटितपणे ते प्रवाशांच्या अंगावर येतात. असा अनुभव अनेक प्रवाशांना असल्याने ते या रिक्षा चालकांशी वाद घालत नाहीत. शुक्रवारी सकाळी एक रुग्णवाहिका चालक पाटकर रस्त्याने रुग्ण घेण्यासाठी चालला होता. चालकाला पाटकर रस्त्याने पुढे जायचे होते. पण या रस्त्यावर कॅनरा बँकेच्या एटीएमसमोर मुख्य वर्दळीच्या रस्त्यावर उभ्या असलेल्या रिक्षा चालकांनी आपल्या रिक्षा बाजुला करण्यास नकार दिला. आणि रुग्णवाहिका चालकाला दुसऱ्या रस्त्याने जाण्याची सूचना केली. या रस्त्याने जाण्यास तुम्हाला जागा नाही, अशी उत्तरे रिक्षा चालक रुग्णवाहिका चालकाला देत होते.

# नारळी पौर्णिमे निमित्त उरण करंजा बंदरात कोळी बांधवानी अर्पण केला दर्याराजाला नारळ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उरण :** नारळी पौर्णिमे निमित्ताने शुक्रवारी करंजा बंदरात रयत शिक्षण संस्थेचे विद्यालयाच्या विद्यार्थी व कोळी बांधवानी ढोल ताशांच्या व बैंड बाजांच्या निनादात वाजत गाजत मिरवणूक काढीत उत्साहात समुद्राला प्रथेनुसार नारळ अर्पण केला. यावेळी सहा फूट लांबी व साडेतीन फूट उंचीच्या प्रतिकात्मक सोन्याच्या नारळाची प्रतिकृती तयार करण्यात आली होती. पारंपरिक वेशभूषेत, अलंकार परिधान करून बँड बाजासह लेझीमच्या तालावर काढण्यात आलेल्या मानाच्या नारळाच्या मिरवणुकी काढण्यात आली.

नारळी पौर्णिमा हा समुद्र किनाऱ्यावर वास्तव्य करणाऱ्या कोळी समाजाचा सर्वात मोठा सण मानला जातो. समुद्र आणि कोळी समाज हे अतूट नातं आहे. पावसाळ्यात खवळलेला समुद्र नारळी पौर्णिमे पासून हळू हळू शांत होऊ लागतो. त्यांनतर कोळी बांधव खोल समुद्रात जाऊन मासेमारी करतात. त्यामुळे समुद्राला शांत होण्यासाठी करण्यात येणारी पूजा ही नारळी पौर्णिमेला केली जाते. पूर्वी यासाठी समुद्राला प्रतिकात्मक सोन्याचा नारळ अर्पण करण्याची प्रथा होती. मात्र सध्या नारळाची प्रतिकात्मक पूजा केली जाते. त्यानुसार द्रोणागिरी हायस्कूल करंजा मराठी, इंग्रजी व सेमी इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांनी कोळयांचा पारंपरिक वेष व दागदागिने परिधान करून सहभाग घेतला होता. यासाठी नारळाची प्रतिकृती विद्यालयातील कलाशिक्षक जोशी यांनी तयार केली होती. बँड वर कोळी गीते वाजवीत मिरवणूक वाजत गाजत करंजा बंदरावर नेण्यात आली. दुपारी समुद्राला पूर्ण भरती आली होती. बोटीतून नारळ करंजा समुद्रात मध्यभागी नेऊन सागर देवाची पूजा, प्रार्थना करुन मच्छिमारांना भरपूर प्रमाणात मासळी मिळू दे अशी विनंती करीत सागराला नारळ अर्पण करण्यात आला. नारळी पौर्णिमा हा कोळी समाजासाठी आनंद आणि उत्साह निर्माण करणारा सण आहे. पावसाळ्यातील जून व जुलै या दोन महिन्यांच्या मासेमारी बंदी नंतर हा समाज पुन्हा एकदा दर्यावर स्वार होऊन नव्याने मासेमारीला सुरुवात करतो. तर याच दिवसानंतर वादळी वारे व प्रचंड खवळलेला समुद्र शांत होण्यास सुरुवात होते. परिणामी मासेमारीतील अपघाताचा धोका कमी होतो. कोळी समाजा आणि समुद्र किनाऱ्यावर वास्तव्य करणारा इतर समाज हा हौशी समाज आहे. त्यामुळे प्रत्येक सण हा उत्साहात व मोठ्या आनंदात साजरा केला जात आहे.

# उल्हासनगर शहर स्थापना...

पान 1 वरुन ▶▶▶ मान्यवरांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले. त्यानंतर येथे कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी जनजागृतीपर पथनाट्य सादर केले, स्वच्छतेबाबत कविता सादर केली.

सदर कार्यक्रमास मा. आमदार श्री. कुमार आयलानी, अतिरिक्त आयुक्त डॉ. किशोर गवस, अतिरिक्त आयुक्त डॉ. धीरज चव्हाण, सहा. आयुक्त (1) तथा जनसंपर्क अधिकारी श्री. अजय साबळे, वाहतुक नियंत्रण शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक श्री. राजेश शिरसाठ, भाजपा उल्हासनगर शहर अध्यक्ष श्री. राजेश वधारिया, महाराष्ट्र राज्य सिंधी साहित्य अकादमीचे पूर्व कार्याध्यक्ष श्री. महेश शुक्रामनी, सहा. आयुक्त श्रीम. सलोनी निवकर, सहा. आयुक्त श्री. मनिष हिवरे, मुख्य बाजार निरीक्षक श्री. विनोद केणे, सुरक्षा अधिकारी श्री. यशवंत सगळे, व इतर मान्यवर तसेच महापालिका अधिकारी/कर्मचारी, आर.के.टी. कॉलेज, एस.एम.कॉलेज, सेंट पॉल कॉलेज, महापालिका शाळा क्रमांक 17 चे विद्यार्थी उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन महापालिका शाळेचे शिक्षक श्री. भास्कर शिंदे यांनी केले.

# बदलापूर स्थानकातील एस्कलेटर कार्यान्वित

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर :** बदलापूर रेल्वे स्थानकाचे अद्ययावतीकरण गेल्या पाच-सहा वर्षांपासून सुरू आहे. मात्र काम पूर्ण होण्यास विलंब होत असल्याने प्रवाशांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर रेल्वे प्रशासनाने प्रवाशांना तात्पुरता दिलासा देत फलाट क्रमांक १ वरील मध्यभागी नवीन स्वयंचलीत जिना (एस्कलेटर) कार्यान्वित केला आहे. यापूर्वी फलाट क्रमांक दोनवरील जिना जुना असल्याने मोठा वादंग झाला होता. गेल्या अनेक वर्षांपासून फलाट क्रमांक एकवर जिना लावण्याची मागणी होती. मात्र फलाट क्रमांक तीनवर जिना लावण्यात आला होता. या नव्या सुविधेमुळे फलाट क्रमांक १ वरून २ व ३ वर जाणे प्रवाशांसाठी अधिक सोयीचे झाले आहे. ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग आणि जड साहित्य घेऊन जाणाऱ्या प्रवाशांसाठी ही सोय विशेषतः उपयुक्त ठरणार आहे.

बदलापूर रेल्वे स्थानकात प्रवाशांची संख्या दिवसेंदिवस वाढत असली तरी प्रवाशांना हव्या तशा सुविधा वेळेत देण्यात रेल्वे प्रशासनाला यश येताना दिसत नाही. त्यामुळे येथे प्रवाशांमध्ये संताप आहे. दिवसेंदिवस गर्दी वाढते आहे. त्या तुलनेत लोकलची संख्या, जागा आणि गर्दीचा प्रश्नही गंभीर होतो आहे. सध्या रेल्वे स्थानकावर डेक बांधनीचे काम सुरू आहे. प्रवाशांच्या मागणीनुसार स्वयंचलीत जिने सुरू केले जात आहेत. फलाट क्रमांक एकवर जिना सुरू झाल्याने प्रवाशांना दिलासा मिळाला आहे. प्रवासी आता फलाट क्रमांक २ वर देखील अशीच सुविधा लवकरात लवकर उपलब्ध व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त करत आहेत. मात्र स्थानकाचे इतर बांधकाम अद्याप अपूर्ण असल्याने प्रवाशांच्या सोयीसाठी कामाचा वेग वाढवण्याची मागणीही कायम आहे.

**स्थानकात लावणार ८ जिने**
**बदलापूर रेल्वे स्थानकात एकूण आठ स्वयंचलित जिने बसवले जाणार आहेत, अशी माहिती रेल्वे प्रशासनाने दिली आहे. यातील सहा स्वयंचलित जिने हे नविन असतील. तर २ जिने हे जुने पण आयुर्मान असलेले असतील. बदलापूर स्थानकातील फलाट क्रमांक दोनवर बसवण्यात आलेला एक जिना हा जुना असल्याने त्यावरून वादंग झाला होता.**



दैनिक ठाणे **जीवनदीप वार्ता**



ठाणे ■ शनिवार ■ ०९ ऑगस्ट २०२५

४

jeevandeepvartanews2020@gmail.com


# कल्याण पूर्वेत मराठी माणसांबद्दल अपशब्द : हॉटेल चालकाला मनसैनिकांचा चोप

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण पूर्वेतील दुर्गामाता मंदिर चौक परिसरात एका हॉटेल चालकाने मराठी माणसांबद्दल बोलताना त्यांना बेदम मारहाण करू, त्याच बरोबर काही अपशब्द वापरले होते. ही दृश्यध्वनी चित्रफित समाज माध्यमांमध्ये प्रसारित होताच, मनसैनिकांनी संघटितपणे जाऊन त्या हॉटेल चालकाला जाब विचारून त्याला चोप दिला. पुन्हा असा काही प्रकार केला तर मनसे पध्दतीने धडा शिकवण्याचा इशारा दिला. मनसे सैनिकांचा आक्रमकपणा पाहून हॉटेल चालकाने मराठी माणसाबद्दल पुन्हा असे काही वक्तव्य करणार नाही असे जाहीरपणे सांगून घडल्या प्रकाराबद्दल पक्षप्रमुख राज ठाकरे आणि मराठी माणसाविषयी केलेल्या वक्तव्याबद्दल दिलगिरी व्यक्त केली. कल्याण, डोंबिवलीत गेल्या वर्षभरात मराठी, अमराठी वादाचे सुमारे पाच ते सहा प्रसंग घडले आहेत. काही प्रकरणे तर न्यायालयापर्यंत पोहचली आहेत. मराठी माणसाला बद्दल अपशब्द वापरणारी दृश्यध्वनी चित्रफित समाज माध्यमांत प्रसारित झाली होती. या दृश्यध्वनी चित्रफितीमध्ये हॉटेल मालक मराठी माणसाला लाल होईपर्यंत मारू, अशी भाषा करत होता. ही दृश्यध्वनी चित्रफित मनसेचे कल्याण पूर्वेतील पदाधिकारी कुश राजपूत यांना पाहण्यास मिळाली. त्यांनी कल्याण पूर्वेतील संबंधित हॉटेलचे ठिकाण आणि त्याचा ठावठिकाणा शोधून काढला.

## जागतिक आदिवासी दिना निमित्त ठाण्यात शोभायात्रेचे आयोजन

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●

**ठाणे दि.08:** जागतिक आदिवासी 09 ऑगस्ट या जागतिक आदिवासी दिनानिमित्त आदिवासी श्रमिक संघर्ष संघटना,महाराष्ट्र राज्य यांच्यावतीने भव्य मोटार सायकल रॅली आणि शोभायात्रेचे आयोजन केले आहे. सदरील रॅली पोष माता मंदिर, भाईंदरपाडा – ओवळा येथून निघणार असून खेवरा फार्म हाऊस, खेवरा सर्कल, चितळसर मानपाडा येथे समाप्त होणार आहे. तरी सर्व आदिवासी बांधवांनी दि.09 ऑगस्ट रोजी सकाळी 10.00 वाजता उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन संस्थापक अध्यक्ष हंसराज खेवरा व सुनिल तु.भांगरे यांनी केले आहे.



## मुंबई -पनवेल -पुणे रेल्वेमार्ग वाढत्या प्रवासी संख्येवर सर्वोत्तम उपाय ठरणार

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●

मुंबई-पुणे तिसरा महामार्ग : आराखड्याचे काम सुरु असल्याचे वृत्त प्रसारमाध्यमातून प्रसिद्ध झालेले आहे . गुणोत्तरीय पद्धतीने वाढत्या वाहन संख्येमुळे वर्तमानातील मुंबई -पुणे द्रुतगती मार्ग आगामी काळात पुरेसा पडणार नसल्याने भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने मुंबई -पुणे तिसरा महामार्ग निर्माण करण्याचे योजिले आहे . वाढत्या वाहन संख्या लक्षात घेत रस्त्यांचे रुंदीकरण , नवीन रस्त्यांची निर्मिती हाच एकमेव पर्याय या दृष्टिकोणापलीकडे जात सरकारने सार्वजनिक वाहतूक सक्षमीकरण हाच वाढत्या प्रवासी संख्येवरील सर्वोत्तम उपाय ठरतो हि बाब लक्षात घेत द्रुतगती महामार्गाला नवीन समांतर रस्त्याचा आरखडा निर्माण करताना त्यातच मुंबई-पनवेल -पुणे अशा रेल्वे मार्गाबाबत देखील विचार करायला हवा . जागेच्या अभावी मुंबई -पनवेल -पुणे असा रेल्वेमार्ग शक्य नसेल तर किमान पनवेल - पुणे अशा नवीन रेल्वे मार्गाबाबत मात्र नक्कीच विचार करायला हवा . अगदी स्वातंत्र्य पूर्व काळात रेल्वे मार्ग बांधून ब्रिटिशांनी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेतील रेल्वेमार्गाचे महत्व अधोरेखित केलेले आहे . १५० वर्षांपूर्वी सीएसएमटी स्थानक बांधताना त्यांनी अत्यंत दूरदृष्टीकोन ठेवल्याने ते स्थानक आजही पुरेसे ठरते आहे. उलटपक्षी नियोजित शहर नवी मुंबई शहराची निर्मिती करताना नव्याने उभारलेल्या हार्बर लाईन निर्माण करताना स्लो आणि फास्ट ट्रॅक याचा विचार न केल्याने सदरील मार्ग असून अडचण,नसून खोळंबा ; अशी झालेली आहे.

भविष्यात अशा प्रकारची पुनरावृत्ती टाळण्यासाठी एनएचएआय ने समांतर मार्ग उभारताना रेल्वे मार्गाबाबत प्राधान्याने विचार करावा. केवळ पायापुरते पाहण्याच्या सवयीला तिलांजली देत भारतीय यंत्रणांनी दूरदृष्टीकोनातून नियोजन करण्यास प्राधान्य देणे अत्यंत आवश्यक आहे . खरे तर , सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचे महत्व लक्षात घेत ; रेल्वे वाहतूक व्यवस्थेचा अधिकाधिक विस्तार आणि सक्षम करण्यास सर्वोच्च प्राधान्य देणे काळाची गरज आहे

## रक्षाबंधनाच्या पूर्व संध्येला भिवंडीतील बाजारपेठा सजल्या

### राख्या कपडे खरेदी साठी महिलांची गर्दी



● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●

**भिवंडी (प्रतिनिधी) :** भाऊ बहिणीचे प्रेमाचे नाते घट्ट करणारा रक्षाबंधन सण उद्या शनिवार (9 ऑगष्ट) रोजी साजरा होणार आहे.त्यामुळे सकाळ पासून बाजारपेठेत राखी,कपडे व इतर सामान खरेदी साठी गर्दी होत आहे.रक्षाबंधन व नारळी पौर्णिमा निमित्ताने ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी भिवंडी शहर परिसरातील बाजारपेठा मध्ये विदयुत रोषनाई करून सजविण्यात आल्या आहेत.राखी बरोबरच विविध प्रकारचे मिठाई, नवीन साडया, ड्रेस मटेरियल खरेदीसाठी महिला,युवती आणि नागरिकांची बाजारामध्ये मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे.

यंदा महिलांनी भारतीय संस्कृतीला प्राधान्य देत मुंबई, गुजरात, दिल्ली, राजस्थान, येथून दुकानांमध्ये विक्रीसाठी आलेल्या राख्या खरेदी करण्यावर महिलांनी प्राधान्य दिले आहे. यंदा लहान मुलांच्या आकर्षक राख्या म्हणून कादुर्ण व सिनेअभिनेता, कमळ, तिरंगाध्वज व विविध राजकीय पक्षांचे चिन्हेचे छायाचित्र असलेल्या राख्या बाजारात प्रथम प्राधान्याने विक्री होत असल्याचे दिसत आहे. महागाई झाली असली तरी सणा निमित्ताने खरेदी मोठया प्रमाणात गर्दी होत आहे.बाजारात खरेदी साठी गर्दी होत आहे.

शहरातील पारनाका - बाजार पेठ, प्रभुआळी, पदमानगर, शिवाजी नगर,तीनबत्ती, कल्याण रोड,धामणकर नाका, कामतघर,अंजूरफाटा,नजराणा रोड,नवीचाळ, भंडारी कंपाऊंड, नारपोली अश्या विविध भागात असलेल्या दुकानात तसेच हाथ गाड्यांवर आकर्षक राख्या

विक्री होत आहेत,लाइट असलेली मोबाइल फोन,गणपती, शिट्टी, रेल्वे इंजिन, डोरिमोल,छोटा भीम,विमान,अमिताभ बच्चन तसेच हनुमान, श्रीकृष्ण असे देवदेवतांचे फोटो, कापसाचे गोंडे, चंदनाच्या व खड्यांचे राख्यांना बाजारात अधिक मागणी असल्याची माहिती दुकानदारांनी दिली.या राख्या 10 रुपयां पासून 200 रुपया पर्यंत विक्रीस आहेत.तर सोनाराचे दुकानात सोन्या चांदीच्या मुलामा असलेल्या एक हजार ते 3 हजार रुपया पर्यंतच्या राख्या

विक्री होत आहेत.राखी पौर्णिमेनिमित्त महिलांनी नवीन साडया,ड्रेस खरेदी करण्यावर ही भर दिल्याने दुकानदारांनी 20 ते 25 टक्के सूट जाहीर करून ग्राहकांना आकर्षित करण्याचा प्रयत्न केला आहे,सणा चे औचित्य साधून मिठाई चे दुकानात पेढे, लाड्डू, बर्फी, जिलेबी, काजू कतली बरोबरच बंगाली मिठाईला मागणी आहे.काजू बदाम पिस्ता इत्यादी ड्रायफ्रूट सुद्धा मोठ्या प्रमाणात विक्री होत आहे.

## 'महाज्योती'चा सागर नाठे देशसेवेच्या शिखरावर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे,दि.07 :** राज्यातील बहुजन विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांसाठी दर्जेदार प्रशिक्षण व आर्थिक सहाय्य पुरवणाऱ्या महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर या संस्थेने आणखी एक शौर्यगाथा घडविली आहे. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (युपीएससी) मार्फत 2024 मध्ये घेण्यात आलेल्या जलसंधारण अधिकारी/वैज्ञानिक (सिव्हिल इंजिनीअरिंग) गट 'ब' पदाच्या परीक्षेत सागर गजानन नाठे या 'महाज्योती'च्या प्रशिक्षणार्थीने देशात सहावा क्रमांक मिळवून संस्थेचा आणि राज्याचा गौरव वाढविला आहे. सागर नाठे यवतमाळ जिल्ह्यातील उमरखेड येथील जलसंपदा विभागात वैज्ञानिक (सिव्हिल इंजिनीअरिंग) गट 'ब' या पदावर नुकतेच रुजू झाले असून, हा 'महाज्योती'साठी आनंदाचा आणि एक ऐतिहासिक क्षण असल्याचा विश्वास 'महाज्योती'चे व्यवस्थापकीय संचालक प्रशांत वावगे यांनी व्यक्त केला.




'महाज्योती' संस्था राज्यातील इतर मागास वर्ग (ओबीसी), विमुक्त जाती-भटक्या जमाती (व्हीजेएनटी) व विशेष मागास (एसबीसी) प्रर्वगातील विद्यार्थ्यांसाठी पूर्व परीक्षा योजना, विद्यावेतन, निवासी प्रशिक्षण केंद्रे, विशेष अभ्यासिका आणि तज्ज्ञ मार्गदर्शकांच्या साहाय्याने दर्जेदार अभ्यासासाठी विविध योजना राबवित आहे.

सागर नाठे याने 2022 मध्ये 'महाज्योती'च्या पूर्व परीक्षा योजनेत यश मिळवून या योजनांमध्ये सहभाग घेतला. संस्थेने त्याला 11 महिन्यांचे मोफत प्रशिक्षण व आर्थिक पाठबळ स्वरूपात विद्यावेतन दिले. या सर्व पाठबळाच्या जोरावर त्याने आपली वाटचाल युपीएससी पर्यंत केली आणि देशात सहावा क्रमांक मिळवून जलसंधारण अधिकारी होण्याचा मान पटकावला. 'महाज्योती'चे व्यवस्थापकीय संचालक प्रशांत वावगे यांनी सागर नाठेच्या यशाबद्दल समाधान व्यक्त करत म्हटले, सागरचे यश हे 'महाज्योती'च्या सामाजिक बांधिलकीवर आधारित प्रशिक्षण मॉडेलचे यश आहे. संस्थेच्या योजनांमुळे अशा विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात येण्याची संधी मिळत असून, शासन सेवेत त्यांच्या माध्यमातून सामाजिक समरसतेचा आधार निर्माण होत आहे. श्री.वावगे यांनी सागर नाठेचे मन:पूर्वक अभिनंदन करीत त्याच्या पुढील कारकिर्दीसाठी शुभेच्छा दिल्या.



## गांजाची वाहतूक करणाऱ्या दोघांना अटक

**वाडा तालुक्यातील वाडा - भिवंडी असलेल्या पाहुणीपाडा गावाच्या हद्दीत अमली पदार्थ असलेल्या गांजाची वाहतूक होणार असल्याची गुप्त माहिती मंगळवार 05 ऑगस्ट रोजी सकाळी 10.30 वाजता वाडा पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचत दुपारी 3:40 वाजताच्या सुमारास घटनास्थळी छापा टाकला**

### ६६ हजारांचा चार किलो गांजा हस्तगत

\- - - - -

### वाडा पोलिसांची कारवाई

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वाडा प्रतिनिधी :** तालुक्यात गांजा या अमली पदार्थाची वाहतूक करणाऱ्या दोन परप्रांतीय आरोपींना अटक केली असुन त्यांच्याकडून ६६ हजारांचा ४ किलो १०० ग्रॅम वजनाचा गांजा हस्तगत करण्यात आला आहे.

अटकेतील आरोपी हेमंत जामुन तांडी (31) व किशोर राजकुमार (26) हे दोघेही सध्या वाडा तालुक्यातील खुपरी येथे प्रशांती हॉटेल लगतच्या चाळीत राहत असून त्यांचे मूळ गाव तालुका केसिंगा, ओरिसा राज्यातील कालाहडी जिल्ह्यातील आहे. त्यांच्यावर वाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करत पुढील तपास सुरू केला आहे.

वाडा तालुक्यातील वाडा - भिवंडी असलेल्या पाहुणीपाडा गावाच्या हद्दीत अमली पदार्थ असलेल्या गांजाची वाहतूक होणार असल्याची गुप्त माहिती मंगळवार 05 ऑगस्ट रोजी सकाळी 10.30 वाजता वाडा पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचत दुपारी 3:40 वाजताच्या सुमारास घटनास्थळी छापा टाकला. यावेळी संशयीतांची अंग झडती घेतली असता बॅगेत गांजा आढळून आल्यानंतर त्यांच्यावर कारवाई केली आहे.

पोलीस अधीक्षक यतीश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली वाडा पोलीस निरीक्षक दत्तात्रेय किंद्रे यांच्या पथकातील सहाय्यक पोलीस निरीक्षक भगवंत चौधरी, पोलीस उपनिरीक्षक सागर मालकर, पोलीस फौजदार गुरुनाथ गोतारणे, पोलीस हवालदार विजय मढवी, केशव गायकवाड, गजानन जाधव, संतोष वाघचौरे, संजीव सुरवसे, सचिन भोये, भूषण खिल्लारे, कमलाकर पाटील यांनी कारवाई केली.

## पशुपालकांना कृषी समकक्ष दर्जाचा लाभ!

### नावनोंदणी करण्यासाठी प्रशासनाचे आवाहन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळाने पशुसंवर्धन व्यवसायास कृषी समकक्ष दर्जा देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला असून, राज्यातील लाखो पशुपालकांना याचा थेट लाभ होणार आहे. या निर्णयामुळे दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, शेळीपालन, वराहपालन यासारखे व्यवसाय आता कृषी व्यवसाय म्हणून गणले जाणार आहेत, आणि त्यामुळे त्यांना अनेक शासकीय सवलती व योजना मिळणार आहेत.

**आपला फार्म नोंदवा आणि योजनांचा लाभ मिळवा :**

. महाराष्ट्र राज्यातील सर्व डेअरी फार्म, पोल्ट्री फार्म, ब्रिडर युनिट, हॅचरी, लेयर फॉर्म, मेंढी-शेळी, वराहपालन युनिट्स यांना आवाहन करण्यात येत आहे की त्यांनी खालील Google Form वर आपली फार्म नोंदणी त्वरित करावी.

***नोंदणीसाठी गुगल फॉर्म लींक :**

https://forms.gle/fkj1FdFKRHx1deeq8

**नोंदणीपूर्वी तयार ठेवा खालील माहिती व कागदपत्रे:**

1. आधार कार्ड आणि मोबाईल नंबर
2. शेत / फार्मचे अक्षांश आणि रेखांश
3. पालन व्यवसायाचा प्रकार (उदा. गाय, म्हैस, कुक्कुट, मेंढी, शेळी, वराह)
4. गोठा / शेडची क्षमता
5. विजेच्या मीटरचा प्रकार/लोड/वापर
6. विद्युत ग्राहक क्रमांक

**कृषी समकक्ष दर्जा मिळाल्यावर मिळणारे लाभ:**

- कृषी वीज दराने विद्युत पुरवठा
- ग्रामपंचायत करात सवलत
- शेतीसारखी व्याजदर सवलत असलेले कर्ज
- सोलर पंपासाठी अनुदान
- शासनाच्या विविध योजना आणि निधीचा लाभ

हा पशुसंवर्धन क्षेत्रातील क्रांतिकारी निर्णय असून, आपला फार्म वेळेत नोंदवा व या योजनांचा लाभ घ्या. राज्यातील 75 लाख पशुपालकांना या निर्णयामुळे आर्थिक स्थैर्य, रोजगार व उत्पादनवाढीचा मोठा फायदा होणार आहे.




## विद्यार्थिनींचे वाशिंद पोलिसांसोबत रक्षाबंधन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर ग्रामीण-( नरेंद्र पाटील)

वाशिंद येथील रियल अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी आणि शिक्षिकांनी रक्षाबंधन निमित्त वाशिंद पोलिस स्टेशन मध्ये जाऊन पोलिस बंधूंना राख्या बांधून एक अनोखा रक्षाबंधन सण साजरा केला. या कार्यक्रमासाठी अनेक पोलिस कर्मचारी यांनी हजेरी लावत त्या सणाचा आनंद द्विगुणित केला. आणि त्यांना रक्षणाचे वचन दिले. सध्या पोलिसांची स्थिती अतिशय हलाखीची असून कोणताही सण असो मात्र हे पोलीस शहरातील शांतता, कायदा, सुव्यवस्था सांभाळण्यासाठी हजर राहून आपले कर्तव्य बजावत असतात त्यामुळे अनेकदा आपले सण उत्सव कुटुंबासोबत साजरे करता येत नाही. आपले कर्तव्य आणि जबाबदारीची जाणीव ठेवून ते आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडत असतात म्हणून त्यांना सण आणि उत्सवांना आपल्या कुटुंबासोबत राहता येत नाही. आपत्कालीन परिस्थिती नियंत्रित आणण्यासाठी अहोरात्र झटणारे आणि कायदा - सुव्यवस्था राखणाऱ्या पोलिसांना वेळेचे बंधन नसते. समाजासाठी आपल्या भूमिका बजावताना अनेकदा पोलिसांना आपल्या कुटुंबियांना वेळ देणे शक्य होत नाही. अनेक सणवार त्यांना कुटुंबियांसोबत साजरे देखील करता येत नाहीत. दरवर्षी रक्षाबंधनाच्या दिवशी अनेक पोलिस गावाकडे असलेल्या बहिणीला भेटून सण साजरा करू शकत नाहीत, त्यामुळे यंदा हा सण पोलिसांसोबत साजरा करावा, अशी संकल्पना रिअल अकॅडमीच्या वाशिंद येथील विद्यार्थिनींनी व शिक्षकांनी केली आणि वासिंद पोलीस ठाण्यात जाऊन उपस्थित सर्व पोलीस कर्मचाऱ्यांना राख्या बांधून बहीण भावाचं अतूट नातं निर्माण केले व अनोखा उपक्रम साजरा केला यावेळी उपस्थित पोलिसांनी बहिणीच्या रक्षणाची हमी दिली.

## मोरोशी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या नशिबी गढूळ पाणी !

### मुख्याध्यापक व प्रकल्प अधिकाऱ्यांचे अक्षम्य दुर्लक्ष !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड :: दिलीप पवार**

शहापूर आदिवासी प्रकल्पातील अनेक शासकीय आश्रम शाळांना अन्याय अत्याचार निर्मूलन समितीचे जिल्हाध्यक्ष अण्णा साळवे यांनी पत्रकारांना सोबत घेऊन,प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली असता मोरोशी येथील आश्रमशाळेची स्थिती अतिशय दयनीय असल्याचे समोर आले आहे. या शाळेत विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी थट्टा आणि खेळ होत असल्याने मुख्याध्यापकावर कारवाईची मागणी केली जात आहे.

मागील काही दिवसापूर्वी मंत्री महोदयांनी या शाळेला भेट दिली असता, शाळेच्या असुविधाबाबत नाराजी व्यक्त करत मुख्याध्यापक भोये यांची चांगलीच कान उघाडणी केली होती परंतु बेजबाबदार मुख्याध्यापक यातून कोणताही धडा



**आमच्या विद्यार्थ्यांना सध्या पाईप लाईनद्वारे विहिरीचे पाणी टाकीत घेतले आहे. शाळेत सध्या दोन फिल्टर आहेत त्यापैकी एक सुरू असून एक बंद आहे.विद्यार्थी संख्या जास्त असल्याने शुद्ध पाणी देण्यास अडचण येते**

**- प्रल्हाद भोये , मुख्याध्यापक मोरोशी शासकीय आश्रम शाळा**

घेताना दिसत नाही. विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर दुर्लक्ष केले असुन मुलांना गढुळ पाणी प्यावे लागत असल्याचे दिसत आहे. सध्या स्थितीत शाळेतील पिण्याच्या पाण्याची अवस्था अत्यंत बिकट असून, वॉटर फिल्टर पूर्णपणे बंद आहे. जनरेटर देखील बंद अवस्थेत असल्याने मूलभूत सुविधा ठप्प आहेत. शाळेत गढूळ पाणी विध्यार्थी यांनी पिण्यासाठी देत असल्याने त्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे तसेच शाळेच्या अवतीभवती गवताची वाढ झाल्यामुळे डास , मच्छरांचा प्रादुर्भाव वाढला आहे. वसतिगृहात पंखे नसल्याने विधार्थी अक्षरशः गर्मीने हैराण होत आहेत. मुख्याध्यापक प्रल्हाद भोये यांचा मनमानी कारभार तसेच प्रकल्प अधिकारी यांचे दुर्लक्ष असल्याने या ठिकाणी आदिवासी विद्यार्थ्यांचा शिक्षणासोबत आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असल्याचा आरोप आण्णा साळवे यांनी केला आहे.

सदर बाबींमुळे येथील विद्यार्थ्यांच्या आरोग्य व सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून, ही संपूर्ण स्थिती पाहता आश्रम शाळेची तात्काळ चौकशी करून कठोर कारवाई करण्याची मागणी अन्याय अत्याचार निर्मूलन समितीचे अण्णा साळवे यांनी आदिवासी विभागाच्या वरिष्ठांकडे केली आहे, अन्यथा जनआंदोलनाचा इशारा अण्णा साळवे यांनी परिसरातील ग्रामस्थांना व पालकांना घेऊन करणार असल्याचे म्हटले आहे.

## नारळी पौर्णिमा आणि रक्षाबंधनाच्या सणात खंडित वीजपुरवठ्याचे विघ्न

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड :** महाराष्ट्र सरकारने लाडक्या बहिणींसाठी जुलै व ऑगस्ट असे दोन महिन्याचे तीन हजार रुपये महिलांच्या खात्यात जमा केल्याने यंदाचे पवित्र रक्षाबंधन तसेच गौरी गणपती सण तेजीत जाणार असल्याचे चित्र दिसत असून आज रक्षा बंधनाच्या आदल्या दिवशी आपल्या लाडक्या भावांना राख्या खरेदीसाठी मुरबाड बाजारपेठेत मोठी गर्दी केली असल्याचे दिसून आले.

ऐण सणाच्या अगोदर खात्यात पैसे आल्याने तालुक्याच्या ग्रामिण भागातील महिलांनी बँका मध्ये पैसे काढण्यासाठी गर्दी केली असून समस्त महिला वर्गात समाधान व आनंद दिसत आहे.पैसे जवळ आल्याने बाजारपेठेत खरेदीसाठी महिलांनी मोठी गर्दी केली असल्याचे दिसून आले.

दर शुक्रवारी मुरबाडचा आठवडी बाजार भरतो त्यात शनिवारी रक्षा बंधन आल्याने महिलांची एकच गर्दी झाली असल्याचे बाजारपेठेतील व्यापारी वर्गाकडून सांगण्यात येत असून शहरातील प्रसिद्ध स्वामी हॉटेल व रामकृष्ण हॉटेल मध्ये सुद्धा नाष्टा व जेवणासाठी महिलांची गर्दी दिसून आली. यंदाचे गौरी - गणपती सण सुद्धा तेजीत जाणार असल्याचे व्यापारी वर्गाकडून सांगण्यात येत आहे.

दरम्यान ऐन सणामध्ये मुरबाड महावितरण कडून सकाळी 10. पासून संध्याकाळ पर्यत शहरासह ग्रामिण भागातील विज पुरवठा नागरिकांना कोणतीही पुर्व सुचना न देता दुरूस्तीसाठी खंडीत केल्याने बाजारपेठेतील व्यापारी वर्गासह , बँकांना याचा त्रास सहन करावा लागला असून महावितरणच्याया बेजबाबदार पणावर नागरिकांनी तिव्र संताप व्यक्त केला आहे.

**मुरबाड विधानसभेचे आमदार किसन कथोरे यांनी अशा प्रकारची स्तुत्य मागणी सरकारकडे केली होती.महायुती सरकारने लाडक्या बहिणींसाठी चांगला निर्णय घेतला असून आज सणासुदीच्या दिवसात महिलांच्या हातात पैसा आल्याने मोठ्या उत्साहाने महिला बाजारात खरेदी करताना दिसत आहेत. - प्रा. नरेश मोरे,**

**अध्यक्ष लोकक्रांती सामाजिक संघटना, भाजपा युवा नेते.**

================

**ऐन सणासुदीच्या काळात दिवसभर लाईट नसणे हे चुकीचे असून बँकेची किंवा ईतर महत्वाची आनलाईन कामे झाली नाहीत- ह.भ.प.धनाजी महाराज भोईर**



बसवून पाटावरी
टिळा लावुन भाऊला
सोनं ते ओवाळायला
पुजा करी पौर्णिमेला.

नारळाला करदोडा
बांधून देई भावाला
धागा एकचं हाताला
ऊर्जा बंध रेशमाला.

दोघं धागे रक्षा करी
भाऊ पाजे तलवारी
दृष्ट कधी वार करी
नातं पडे त्याला भारी.

जगात बंधन भारी
एक नाड अवतारी
शिक संस्कृती भरी
कुटुंब एकीत सारी.

पौर्णिमेचा तोचि चंद्र
नातं बहीण भावाचं
लाजे देव पण इंद्र
भाऊ नातं बंधनाचं.© ®

**प्रदीप पाटील**
**गणपूर जिल्हा. जळगाव**
**मो. 9922239055**


Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.